HGH INDIA® 2022
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
December 13-16, 2022
Bombay Exhibition Center, Mumbai

NEWS 1

A TEXZONE Event
www.hghindia.com

Where business feels at home!

# मुंबईत स्वागत आहे!



### वसंत ऋतूच्या निमित्तानं काही नवीन प्रदर्शक, नवीन उत्पादनं आणि प्रदर्शक व भेटकर्त्यांसह HGH India मुंबईत पुन्हा दाखल...

जवळपास तीन वर्षांच्या विरामानंतर HGH India च्या १२ व्या आवृत्तीचं आयोजन दिनांक १३-१६ डिसेंबर २०२२ दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव येथे करण्यात आलं असून अलीकडेच समाप्त झालेल्या बंपर दिवाळी विक्री मोसमाची झिंग पुन्हा एकदा जागी करायला सज्ज आहे. घरात लागणाऱ्या उत्पादनांची वर्गवारी जसे की होम टेक्सटाईल, होम डेकोर, होम फर्निचर, हाऊसवेअर आणि भेटवस्तूने आगामी HGH India



2022 सजलेलं दिसेल. सुमारे तीन वर्षांच्या विश्रांतीनंतर मुंबईत HGH India 2022चं आयोजन करण्यात आलं आहे. विक्री बऱ्यापैकी होत असल्याचं विक्रेते तसंच पुरवठादार सांगतात. दिवाळीची धामधूम अलीकडेच संपल्याने उत्तम गुणवत्ता, आलिशान श्रेणी राखत वसंत २०२३ करिता ग्राहक मागणी पूर्ण करण्यासाठी नवा साठा तयार ठेवण्याची गरज आहे.

संपूर्ण भारत तसेच इतर 30 देशांमधून प्रदर्शित होणाऱ्या 400 ब्रँड आणि उत्पादकांमधील 100 हून अधिक नवीन प्रदर्शकांसह, HGH इंडिया 2022 स्प्रिंग/समर एडिशनमध्ये होम टेक्सटाईल, होम डेकोर, होम फर्निचर, गृहोपयोगी वस्तूंमध्ये अनेक नवीन उत्पादनं आणि नवीन पुरवठादार आणि भेटवस्तू श्रेणीचे स्वागत व अनावरण करण्यासाठी सज्ज आहे. या व्यापारी कार्यक्रमाच्या आगामी 12व्या आवृत्तीत बाजाराच्या परिस्थितीत व्यापार खरेदीदारांच्या स्पधार्त्मक धोरणाला चालना देईल. घरगुती उत्पादनांची ग्राहकांची मागणी दरवर्षी 20% दराने वाढते आहे आणि तरीही ब्रँड, उत्पादक आणि किरकोळ विक्रेते यांच्याकरिता प्रगत व्यापारी मंचांवर ऑनलाईन किंवा ऑफलाईन-नवोन्मेषांची ऑफर न देता- त्यांच्या व्यवसायात टिकून राहणे कठीण आहे.

महामारीनंतर पहिल्यांदाच HGH India परतलाय, भारतभर 560 हून अधिक महानगरे आणि शहरांत हजारो विक्रेत्यांकरिता काही नाविन्यपूर्ण आविषकरांचे अनावरण करण्याची सज्जता आहे.

पहिल्या काही प्रमुख सहभागीदारांवर नजर फिरविल्यास इटालियन पॅव्हेलियनमध्ये इटालियन ट्रेड एजन्सी (आयटीए) अंतर्गत ९ प्रदर्शनकर्त्यांचा प्रत्यक्ष सहभाग राहणार असून ते त्यांची होम फर्निचर, अंतर्गत सजावट संकल्पना आणि सजावटीच्या सु-आरेखित श्रेणींचे सादरीकरण करतील. वितरक, ब्रँड प्रतिनिधी, फ्रेंचायजी, आयातदार, वास्तूविशारद त्याचप्रमाणे इंटीरियर डिझायनर यांच्या रूपात भारतातील दीर्घकालीन व्यवसाय भागीदार ओळखायचा प्राथमिक उद्देश आहे.

2022 च्या नुकत्याच संपलेल्या दिवाळी आणि सणासुदीच्या हंगामात बहुतांश घरगुती उत्पादनांच्या श्रेणीतील आघाडीच्या किरकोळ विक्रेत्यांनी चांगली विक्री अनुभवल्याने, ते आता स्प्रिंग/समर 2023 साठी त्यांच्या दालनात नवीन संग्रह सादर करण्याची उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

## होम टेक्सटाईल आणि फर्निशिंग

घरगुती वापरासाठी होम टेक्सटाईल आणि फर्निशिंग फॅब्रिक पुन्हा एकदा HGH India मधील सर्वात महत्त्वाच्या श्रेणीचा भाग असेल. ही श्रेणी हॉल 1 मध्ये पाहता मिळेल. प्रदर्शकांकडे हे सुस्थापित ब्रँड, निर्यातदार, उत्पादक आणि संपूर्ण भारतातील नवीन प्रवेशकर्त्यांचे अनोखे पर्याय असतील, जे फर्निशिंग फॅब्रिक, बेड आणि बाथ, कुशन कव्हर, पडदे आणि थ्रो यासारखे सजावटीसंबंधी मेड-अप; बाथ मॅट



Maspar

आणि रग्ज, कार्पेट आणि ड्युरी यांसारखी विस्तृत श्रेणी उपलब्ध करून देतात.

Maspar, Pan Overseas, Gauvins, Shardha Terry (Micro Cotton), Krishna Kotex (Bonher), K.G. Denim, Microfiber (Turkey) Asadip, Home Fabrics, Home Story, Devtara (Shayan), Lakasa, Liberty India (Enrya), Doctor Towels, Plucci, Bhairavanath (Cortina), Bhikshu Fabrics, Elegant Weavers, Balvigna आणि तत्सम मुख्य प्रदर्शकांचा समावेश आहे.

## रग्ज आणि कार्पेट

घरं सजवताना स्टाईल आणि तपशीलांकडे जास्त लक्ष दिल्याने, हाताने आणि यंत्राने बनवलेल्या रग्ज आणि कार्पेटना ग्राहकांची मागणी दरवर्षी 20% दराने वाढत आहे. या श्रेणीची व्याप्ती वाढत असल्याचा अनुभव किरकोळ विक्रेते आता करत आहेत. भदोही, मिर्झापूर, वाराणसी,



Enrya

आग्रा, पानिपत, जयपूर आणि दिल्ली यांसारख्या प्रमुख उत्पादन केंद्रांमधील उत्पादक त्यांच्या आधुनिक आणि पारंपरीक गोधड्यांची नवीनतम उत्पादन श्रेणी प्रदर्शित करतील.

या श्रेणीत Kaleen, Shamshi Exports, Asian Rug Mart, Elegant Weavers, Maspar, Pan Overseas, Enrya (Liberty), Rugs & Home, S. Nath Tex, AC Concept, Home Floor and Anil Kumar Handloom House हे काही प्रमख प्रदर्शक असतील.

नवोन्मेष ▪ ट्रेंड्स् ▪ उत्पादनं ▪ स्रोत ▪ संधी

### सजावटीचं फ्लोअरिंग

तंत्रज्ञान आणि सामग्रीच्या आगमनाने, अलिकडच्या वर्षांत सजावटीच्या फ्लोअरिंगमध्ये अनेक नवीन उत्पादने सादर केली गेली आहेत. HGH India वुडन फ्लोअरिंग, लॅमिनेटेड फ्लोअरिंग्स, पीव्हीसी फ्लोअर्स, कृत्रिम गवत, कार्पेट टाइल्स, विनाइल फ्लोअर्स इत्यादी आधुनिक फ्लोअरिंगचे विविध प्रकार प्रदर्शित करेल.

तम्हाला लाकडी आणि लॅमिनेटेड फ्लोअरिंग करिता HGH India येथे ग्रीनलॅम (भारत) आणि Li&Pra S.P.A (इटली), एटीएम एंटरप्रायझेस त्यांच्या स्वत:च्या ब्रँड नावाने, डिझायनर फ्लोअरिंग अंतर्गत आयात केलेले लाकडी आणि लॅमिनेटेड आणि फ्लोअरिंगचे विविध प्रकार प्रदर्शित करतील. मॅट्स फोर आणि कॉयर क्राफ्ट काथ्यापासून बनवलेले डोअर मॅट दाखवतील.



Li & Pra Spa

कॅनडाचं सुप्रसिद्ध Vinyl, Sapana, Sahil, Ilan, Fyne Surfaces, HVT Interiors, Comfort Mats, Elen, Eturf, Empress Universe, Novelty'च्या वतीने पीव्हीसी, टर्फ, सिंथेटिक टाइल्स इत्यादी सिंथेटिक फ्लोअरिंगचे विविध प्रकार प्रदर्शित करतील.

### भिंती आणि खिडक्या

किरकोळ विक्रेते आणि वितरकांना गृहसजावटीच्या या महत्त्वाच्या श्रेणीतील आगामी साहित्य, डिझाईन, तंत्रज्ञान आणि बाजारातील ट्रेंड समजून घेण्यासाठी HGH India ने प्रथमच भिंती आणि खिडक्या म्हणजेच वॉल्स आणि विंडोजवर विशेष लक्ष केंद्रीत केलं आहे. जिथे मागणी दरवर्षी 15-20% दरम्यान वाढत आहे. भिंती आणि खिडक्यांमध्ये पडदे आणि भिंतींच्या सजावटीसाठी फर्निशिंग फॅब्रिक, ब्लाइंड्स, वॉलपेपर, सजावटीच्या पडद्याचे रॉड आणि भिंती आणि खिडक्यांसाठी सजावटीच्या उत्पादनांचा समावेश असेल.

या तिन्ही श्रेण्या हातात हात घालून फिरतात आणि त्यामुळे बहुतेक ब्रँड्स वॉलपेपर, पडदे किंवा ब्लाइंड्स यापैकी दोन अधिक प्रमाणात लॉंच करत आहेत. Viento, Nova, G.D. Gupta, Marshalls, S.C. Sheth, D-Wall, Munshi Enterprise, Eximus, Creative Décor हे या श्रेणीतील प्रमुख ब्रँड्स आहेत.

भिंती आणि खिडक्यांना समर्पित खास संकल्पना-आधारीत पॅव्हेलियन HGH India'च्या वतीने प्रायोजित असतील. ज्याद्वारे इथे भेट देणाऱ्यांना आगामी साहित्य त्याचप्रमाणे आरेखनासंबंधी ट्रेंड्सचा अंदाज येईल.

### टेबलवेअर

टेबलवेअर विभाग पूर्वीपेक्षा अधिक आरेखन म्हणजेच डिझाईन आणि साहित्यविषयक नवकल्पनांचा साक्षीदार आहे. स्टेनलेस स्टीलपासून सिरॅमिकपर्यंत, बोन चायना, काच, ओपलवेअर, मेलामाइन, लाकूड... HGH India मधील प्रदर्शक डिनरवेअर, सर्व्हवेअर, कॉकटेल आणि बार ॲक्सेसरीज, काचेच्या वस्तू, कटलरी, सर्व्हवेअर, प्लेटर्स, टेबल



लिनन, प्लेसमेट्स आणि टेबलमध्ये विविध प्रकारचे प्रस्ताव देतील. सजावटीच्या बाजारपेठेतील सर्व प्रकारांत अगदी आलिशान, उंची, परवडणारे ते मोठ्या प्रमाणापर्यंत विविध गुणवत्तेची आणि किमतीची उत्पादनं उपलब्ध असतील. Noritake, Duralex, Dankatuwa, Roxx, Luminarc, AWK, Sanjeev Kapoor, Shapes, Rajlaxmi, DC Ceramics, Superware, Jagdamba Glass, Apaar, Shri & Sam, Naturallyours, Max Fresh, Stehlen सारखे ब्रँड त्यांच्या नवीनतम उत्पादन श्रेणीचे प्रदर्शन करतील.

### साठवण आणि प्लास्टिक

ग्राहक साठवण (स्टोरेज) आणि प्लास्टिकच्या श्रेणीत आरेखन, कार्यक्षमता आणि जीवनशैलीचं मिश्रण शोधतात, ज्याला एकेकाळी फक्त मूलभूत गरज मानली जायची. याकडे किरकोळ विक्रेते आणि उत्पादकांचं फारसे लक्ष नाही. मागणीचे स्वरूप झपाट्याने ब्रँडेड आणि उंची उत्पादनांमध्ये रूपांतरित होत असल्याने, या श्रेणीत आरेखन आणि साहित्यात अनेक नवनवीन शोध पाहायला मिळतील.

प्रदर्शनात साठवणकरिता प्लास्टिक वस्तू, लंच बॉक्स, इन्सुलेटेड बाटल्या, स्टीलच्या बाटल्या, कॅसरोल, फ्लास्क, आयोजक, लॉन्ड्री बॅग, कंटेनर, सामान्य साठवणूक आणि घरातील वस्तूंचा समावेश असेल. Nanobot, Falcon, Neo Plast, Levanto आणि Steelo सारखे नियमित प्रदर्शक त्यांच्या नवीन संग्रहांचे अनावरण करतील. याशिवाय, HGH India च्या या आवृत्तीतील अनेक प्रथमच प्रदर्शक नवीन उत्पादन कल्पनांच्या बाबतीत खरेदीदारांना उच्च आश्वासन देतात. साठवणूक आणि प्लास्टिक श्रेणीतील काही प्रथमच प्रदर्शकांमध्ये Modware, V-bott, Tiger, Tistabene, Harbour Trends, Attro, Lofa, Basik आणि Lufron यांचा समावेश आहे.

### कुकवेअर आणि किचन उपकरणं

अनेक सुस्थापित आंतरराष्ट्रीय आणि भारतीय ब्रँड, HGH India येथे प्रथमच सादर होणार आहेत. ते सर्व किमतीत आरेखन, सुधारीत उत्पादन वैशिष्ट्यं आणि श्रेणीसुधार गुणवत्तेतील नवकल्पनांचे अनावरण करतील. किरकोळ विक्रेते आणि प्रादेशिक वितरकांसाठी, या विभागातील आघाडीच्या कंपन्यांमधील वरिष्ठ निर्णयकर्त्यांशी संवाद साधण्याची ही एक योग्य संधी असेल. प्रदर्शक तरुण भारतीय



U-Cook

ग्राहकांच्या जीवनशैलीला साजेसे पर्यावरणपूरक, ऊर्जा बचत आणि आरोग्यदायी स्वयंपाक उपाय देऊ करतील. कुकवेअर आणि किचन अप्लायन्सेसमधील नवकल्पनांच्या घटकांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, फॅशन रंग, सुरक्षित साहित्य, स्मार्ट वापर आणि सुविधा याशिवाय पर्यावरणस्नेही समावेश होतो. सौर कुकर, चमकदार रंगाचे फूड प्रोसेसर, पोषक सुरक्षित ज्युसर आणि आरोग्य-सुरक्षित मुलाम्यासह कुकवेअर देण्यासाठी ब्रँड एकमेकांशी स्पर्धा करत आहेत. HGH India च्या आगामी 12 व्या आवृत्तीला भेट देणारे यापैकी अनेक उत्पादनांत रस घेतील.

Wonderchef, Glen, Alda, Hawkins, U-Cook, United Ekta, Nolta, Roxx, Mpee, Roca, Vikas, Rajlaxmi, Shri & Sam, Jagdamba यांसारखे अनेक आघाडीचे ब्रँड हे कुकवेअर आणि स्वयंपाकघरातील उपकरणांची नवीनतम उत्पादन श्रेणी मांडणार आहेत.

### होम डेकोर: काळानुरूप बदलत आहे

एक उत्पादन श्रेणी म्हणून गृह सजावट साहित्य, आरेखन, ग्राहक प्राधान्ये आणि जीवनशैलीत सतत बदल आत्मसात करत आहे. HGH India च्या आगामी आवृत्तीत हे पुन्हा एकदा दिसून येईल.

ग्राहकांचा घरी अधिक वेळ जातो, त्यासाठी त्यांना घराची सजावट बदलून त्यांच्या राहणीमानात सतत सुधारणा करायची असते. घरच्या भिंती, मजले, छत किंवा टेबल या श्रेणी आता अशा लोकांसाठी छंद बनतो आहे. ज्यांना आपल्या घराला नवीन, सौंदर्यात्मक आनंददायी आणि कार्यक्षम ठेवण्याची इच्छा असते. किरकोळ विक्रेत्यांद्वारे होम



डेकोर देखील एक प्रमुख नवीन संधी म्हणून ओळखली जाते. आपल्या स्टोअरचे प्रोफाइल त्वरीत बदलण्यासाठी आणि ग्राहकांचा अनुभव वाढवण्यासाठी व्यापारी मालाची भर घालण्याकरिता विक्रेते उत्सुक आहेत. HGH India 2022 अनेक नवीन आंतरराष्ट्रीय उत्पादन प्रस्ताव समोर येतील. इथे हस्तकलेपासून ते आधुनिक सजावटीच्या वस्तूंपर्यंत, कलाकृतींपासून मूर्तींपर्यंत, सुगंध, मेणबत्त्या आणि सुगंध, टेबल सजावट ते सजावटीच्या दिव्यांपर्यंतची उत्पादन श्रेणी अफाट असेल. ITA आयोजित इटालियन नॅशनल पॅव्हेलियनमध्ये अनेक इटालियन प्रदर्शकांद्वारे भारतात प्रथमच सजावटीच्या काचेच्या वस्तू, कलाकृती, मूर्ती आणि सजावटीच्या उपकरणांची एक अतिशय नाविन्यपूर्ण डिझायनर श्रेणी सादर करण्यात येईल. याशिवाय, इथे डिजिटल वॉलपेपर, लॅमिनेटेड फ्लोअर कव्हरिंग्ज, खुर्च्या आणि घरातील फर्निचर देखील पाहायला मिळतील. घरगुती सजावटीचा विचार केल्यास, व्यापार खरेदीदार हे मुरादाबाद, फिरोजाबाद, सहारनपूर, खुर्जा, जयपूर, जोधपूर, आग्रा, दिल्ली, रांची, राजकोट आणि भारतातील इतर अनेक उत्पादन केंद्रांमधून विस्तृत श्रेणी शोधू शकतात. याशिवाय भारत, चीन, युरोप, जपान, थायलंड, व्हिएतनाम इत्यादी देशांतील अनेक उत्पादक आणि आयातदार आधुनिक सजावटीची उत्पादनं, फ्लोअरिंग आणि साहित्य सादर करतील.

### भारतातील ४ था सर्वात मोठा फर्निचर आणि फर्निशिंग पुरवठादार

# ९ नव्या प्रदर्शनकर्त्यांसह इटलीचे पुनरागमन

HGH Indiaच्या 12 व्या प्रदर्शनासाठी नवी दिल्लीतील इटालियन ट्रेड कमिशनने पुनरागमन केले आहे. डिसेंबर 2021 मध्ये, जग कोव्हीड-19 च्या धक्क्यातून सावरत होते. त्यावेळी, ग्रेटर नॉयडामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 10 व्या HGH Indiaच्या महासाथीनंतरच्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होणारा इटली हा पहिला देश होता. ट्रेड कमिशनर/ नवी दिल्लीतील इटालियन ट्रेड एजन्सीचे डायरेक्टर अलस्सान्द्रो लिबराटोरी म्हणाले, "डिसेंबर 2021 मधील आमचा सहभाग हा 6 इटालियन कंपन्यांच्या कॅटलॉग प्रदर्शनाच्या स्वरुपात होता आणि यासाठी केवळ 18 चौ. मीटर जागा उपलब्ध होती. यावेळी इटालियन राष्ट्रीय पॅव्हेलियन असणारी सुमारे 137 चौ. मी. जागा आम्ही व्यापली असून 9 इटालियन कंपन्यांचा यात समावेश आहे. म्हणूनच आमच्या सहभागाबाबत आणि एकंदरच भारतीय बाजाराच्या बाबतीत आम्ही अतिशय उत्साही आहोत. प्रदर्शनकर्त्या अनेक इटालियन कंपन्यांसाठी भारतातील हा पहिला अनुभव असेल. त्या भारतीय बाजाराबाबत अतिशय आशावादी आहेत. या



**अलस्सान्द्रो लिबराटोरी**

*ट्रेड कमिशनर/ डायरेक्टर ऑफ इटालियन ट्रेड एजन्सी - नवी दिल्ली कॉर्डीनेटर - इंडिया, बांग्लादेश, श्रीलंका*

पहिल्या सहभागासाठी भारतीय बाजरात मदत करू शकतील अशा भारतीय आयातदार/ वितरक, रिटेलर्स, इंटेरीअर डिझायनर आणि वास्तुविशारद तसेच संभाव्य व्यवसाय भागीदारांशी संवाद साधण्यासाठी त्या उत्सुक आहेत.

**भारत-इटली व्यवसाय भागीदारीच्या संधी**

संशोधन आणि आपण जगत असलेल्या काळानुसारच्या कल्पकतेसाठी, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रक्रियेअंतर्गत सातत्याने विकसित होत असलेल्या डिझाईनसाठी इटालियन कंपन्या ओळखल्या जातात. सौंदर्य, शैली, गुणवत्ता, मोहकता आणि हस्तकौशल्य यांचा प्रतिध्वनी म्हणजेच 'मेड इन इटली'! भरपूर भटकंती करणाऱ्या ग्राहकाला याचेच आकर्षण असते. भारतीय ग्राहकाला जे हवे आहे ते आपल्या भारतीय भागीदारांना देऊ करण्याची क्षमता डिझाईनमध्ये प्राविण्य प्राप्त असलेल्या इटालियन कंपन्यांकडे आहे. म्हणूनच, भारतीय पुनर्विक्रेते आणि इटालियन उत्पादकांसाठी अनेक समान संधी आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून, इटली हा देश फर्निचर आणि फर्निशिंगमधील भारताचा सातत्याने 4 थ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पुरवठादार राहिला आहे. जानेवारी ते ऑगस्ट 2022 या कालावधीदरम्यान, भारताने 46.5 दशलक्ष युरो इतक्या किमतीचे फर्निचर आयात करून गेल्या वर्षातील याच कालावधी दरम्यानच्या तुलनेत 24.7% ची वाढ नोंदवली आहे.

महासाथीच्या संकटातही भारत ही जगातील सर्वात लवचिक आणि झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि इटालियन कंपन्या हे वास्तव जाणून आहेत. जागतिक पुरवठा शृंखलेमध्ये अनिश्चितता असतानाही, इटलीने स्वत:च्या तंत्रज्ञान प्राविण्याच्या जोरावर भारत सरकार आणि उद्योगांना त्यांचे भारताला उत्पादन केंद्र करण्याचे लक्ष्य गाठण्यासाठी नेहमीच सहकार्य केले आहे. जागतिक पुरवठा शृंखलेतील या बदलाकडे जगाचे डोळे लागले आहेत.

**ITA आणि तिची भूमिका**

इटालियन ट्रेड एजन्सी ही एक सरकारी एजन्सी असून ती परदेशातील इटालियन कंपन्यांच्या व्यवसाय विकासाला पाठबळ देते आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीयकरणात त्यांना मदत करते.

प्रेरणाप्राप्त, आधुनिक संस्था तसेच 65 देशांमध्ये 79 परदेशी कार्यालयांचे व्यापक जाळे असलेली ITA, इटालियन छोट्या आणि मध्यम व्यवसायांना माहिती, मदत, सल्ला, प्रसार आणि प्रशिक्षण देण्याचे काम करते. अत्याधुनिक बहुविध प्रसार आणि संवाद उपकरणांचा वापर करून, मेड इन इटलीची श्रेष्ठता ती जगापुढे ठासून मांडते.

याकरिता HGH India 2022 मध्ये राष्ट्रीय पॅव्हेलियनद्वारे सध्याच्या सहभागातून, 'मेड इन इटली' च्या रेलचेलीमध्ये भारतीय बाजाराचा परिचय करून घेण्याचा तिचा हेतू आहे.

इटालियन नॅशनल पॅव्हेलियनमध्ये सहभागी असलेल्या इटालियन कंपन्या (खाली केलेल्या कंपन्यांच्या उत्पादनांचा उल्लेख करून त्यांची चित्रे ठेवा)-



A Casa K. S.A.S.



Brunel S.R.L. Preziosi D'Autore



Seven Sedie Reproductions SRL



Zanetti Murano SRL



Lym SRL



Status SRL



Cesare Ferrari Group



Li & Pra Spa



Grassi Pietre SRL

# फॅशन ट्रेंड्स् । बाजारातील ट्रेंड्स् । स्रोत । व्यवसाय संधी

## भेट देणाऱ्यांची माहिती

मुंबईतील गोरेगाव पूर्व येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 13-16 डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या HGH India 2022 च्या ऑटम/विंटर प्रदर्शनाला भेट देण्यासाठी संपूर्ण भारतातून 500 पेक्षा जास्त महानगरं आणि शहरांमधील हजारोंच्या संख्येने झालेल्या पूर्व-नोंदण्यांमधून रिटेलर्स आणि व्यापार खरेदीदारांचा उत्साह दिसून येत आहे. या भेट देणाऱ्यांमध्ये रिटेलर, वितरक, आयातदार, निर्यातदार, घाऊक व्यापारी, अडत्या (एजंट्स), मोठ्या स्वरुपातील दुकाने, संस्थात्मक खरेदीदार, वास्तुविशारद, इंटेरीअर डिझायनर, आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदार इ. चा समावेश होतो. या भेट देणाऱ्यांपैकी 90 % जण स्रोत/सोर्सिंग आणि व्यवसायासंदर्भातील त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील श्रेष्ठ निर्णयकर्ते आहेत. आगामी सणासुदीच्या दिवसांसाठी सोर्सिंग करणे, नाविन्यपूर्ण उत्पादनांचा शोध घेणे, नवीन व्यापार कल्पना मिळवणे आणि 2022/23 साठी भावी फॅशन कल जाणून घेणे तसेच बाजार आणि उद्योगाची दिशा समजून घेणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. यामुळे त्यांना त्यांच्या व्यवसायाची आखणी जास्त चांगल्याप्रकारे करण्यासाठी मदत मिळू शकेल. त्यांना आपल्या नियमित पुरवठादारांना भेटण्यासाठी आणि नव्या स्रोतांशी संपर्क साधण्यासाठी HGH India 2022 ही एक उत्तम संधी आहे.

यंदा अभ्यागत नोंदणीकरणात भारतातील सर्व राज्यांचा आणि केंद्र शासित प्रदेशांचा समावेश आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरु, चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, हैद्राबाद, पुणे, नागपूर, लुधियाना, जयपूर, चंदीगड आणि इंदूर यासारख्या महानगर आणि मोठ्या शहरांमधील अग्रणी किरकोळ विक्रेत्यांसह सर्व राज्यांच्या राजधानीतील टीअर 2 तसेच टीअर 3 शहरांतील आणि नगरांमधील किरकोळ विक्रेत्यांनी मोठ्या संख्येने केलेली नोंदणी ही भारतीय घरगुती उत्पादन बाजाराची व्यापकता वाढत असल्याचे आणि देशभरात HGH India ला भेट देणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत.

24 देशांमधून 200 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय अभ्यागतांची नोंदणी झाली आहे. मुख्यत्वे करून उद्योन्मुख बाजारांमुळे HGH India हे त्यांच्या प्रदर्शनकर्त्यांसाठी एक आकर्षक निर्यात बाजार संधी ठरत आहे.

### HGH India 2022

**भेट देण्याची वेळ**

13 डिसेंबर : सकाळी 09.00 – संध्याकाळी 06. 30 वा. पर्यंत

14 डिसेंबर : सकाळी 09.00 – संध्याकाळी 06. 30 वा. पर्यंत

15 डिसेंबर : सकाळी 09.00 – संध्याकाळी 06. 30 वा. पर्यंत.

16 डिसेंबर : सकाळी 09.00 – संध्याकाळी 05.00 वा. पर्यंत

HGH INDIA® 2022
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE

**December 13-16, 2022**
BOMBAY EXHIBITION CENTRE, MUMBAI

## ट्रेड अभ्यागत !

## ऑनलाईन नोंदणी 5 डिसेंबर, 2022 पर्यंत
## लगेच मोफत पूर्व-नोंदणी करा आणि प्रवेश शुल्कावर रु. 1000/- ची बचत करा

13 ते 16 डिसेंबर, 2022 दरम्यान मुंबईतील नेस्को (एनईएससीओ) येथे HGH India 2022 चे आयोजन 500 पेक्षा जास्त ब्रँड्स आणि उत्पादकांचा समावेश नाविन्यपूर्ण आणि दर्जेदार गुणवत्तेची उत्पादने 2022/23 साठी फॅशन आणि जीवनशैली ट्रेंड्सच्या अंदाजाने प्रेरित आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या आधीच त्यांना गाठा !

सर्व पूर्व-नोंदणीकृत अभ्यागतांनी HGH India 2022 च्या पूर्व-नोंदणी अभ्यागत डेस्कवर जाऊन त्यांचा क्यूअर कोड स्कॅन करून किंवा HGH India टीमकडून एसएमएस अथवा ईमेलद्वारे मिळालेला संदर्भ क्रमांक नोंदवून त्यांचे प्रवेश पत्र मोफत छापून घ्यावे.

पूर्व-नोंदणी नसलेल्या थेट कार्यक्रम ठिकाणी येणाऱ्या इतर सर्व अभ्यागतांनी प्रती व्यक्ती रु. 1000/- भरून स्पॉट अभ्यागत नोंदणी करणे आवश्यक आहे. ही रक्कम रोख स्वरुपात किंवा क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड अथवा पेटीएमद्वारे देता येईल.




**होम टेक्स्टाईल** फर्निशिंग फॅब्रिक, पडदे आणि ब्लाईन्ड, बेड लिनन, डेकोरेटीव्ह मेड-अप्स, गाद्या आणि उशा, गालिचे, बाथ लिनन, टेबल आणि किचन लिनन. गृह सजावट (होम डेकोर) सिलिंग, भिंती, खिडक्या, फ्लोअर कव्हरिंग, टेबल टॉप, डेकोरेटिव्ह ॲक्सेसरी, लाईफस्टाईल. **होम फर्निचर** कॉफी टेबल, मासिकांसाठीचा रॅक, वॉल सेपरेटर, बीन बॅग, एकच खुर्ची, रॅक आणि ट्रॉली, ॲक्सेन्ट फर्निचर, सोफा, बेड सेट, कपाटे, बेबी आणि किड्स फर्निचर, आऊटडोअर फर्निचर. **भेटवस्तू (गिफ्ट्स)** कॉर्पोरेट, वैयक्तिक आणि उत्सवी. **गृहपयोगी (हाऊसवेअर)** स्वयंपाकघरातील उपकरणे, किचनवेअर, कुकवेअर, टेबलवेअर, बाथरूम, मेन्टेनन्स, स्वच्छता, साठवणूक, आऊटडोअर.

### सर्व्हिसेस विशेष लाभांचा आनंद घ्या

- HGH India 2022 मध्ये मोफत प्रवेश मिळवा.
- पूर्व-नोंदणीकृत अभ्यागत म्हणून कार्यक्रम ठिकाणी तुमचा बॅज मिळवून वेळ वाचवा. तुमच्या ऑनलाईन नोंदणीनंतर तुम्हाला पाठवण्यात आलेला पूर्व-नोंदणी क्यूआर कोड स्कॅन करून तुमच्या बॅजची थेट प्रिंटआऊट घ्या.
- HGH India 2022 कॅटलॉगची एक प्रत मोफत.
- प्रामाणिक अभ्यागतांसाठी HGH Indiaतर्फे मोफत हॉट लाउंज, फ्रुट लाउंज, फुट स्पा लाउंज, अभ्यागत लाउंज, शटल बस सेवा आणि इतर सुविधांचा लाभ घ्या.

*या सुविधांचा लाभ घेण्यासाठी आणि स्पॉट नोंदणी शुल्क वाचवण्यासाठी, तम्ही 5 डिसेंबर 2022 पर्यंत आमच्या www.hghindia.com या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.*

### मोफत अभ्यागत नोंदणी मार्गदर्शकतत्त्वे

- मोफत प्रवेशासाठी ऑनलाईन अभ्यागत नोंदणी करणे अनिवार्य आहे. ऑनलाईन नोंदणी न केलेल्या सर्व अभ्यागतांना ट्रेड शोमधील प्रवेशासाठी रु. 1000/- स्पॉट नोंदणी शुल्क भरावे लागेल.
- प्रदर्शनकर्त्यांकडून अथवा आयोजकांकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निमंत्रण पत्रिकेमुळे तुम्हाला ट्रेड शोच्या ठिकाणी मोफत स्पॉट नोंदणी करण्याचा हक्क मिळणार नाही.
- ऑनलाईन अभ्यागत नोंदणीची अंतिम तारीख: 5 डिसेंबर 2022

#### नियमित अभ्यागतासाठी मोफत ऑनलाईन अभ्यागत प्रवेशाचे टप्पे-

1. www.hghindia.com च्या होम पेज अथवा व्हिजीटर मेन्यूमधील 'व्हिजीटर रजिस्ट्रेशन' वर क्लिक करा.
2. तुमचा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी नोंदवा.
3. सेंड ओटीपीवर क्लिक करा.
4. तुमच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर आणि ईमेल आयडीवर प्राप्त झालेला ओटीपी नोंदवा.
5. तुम्ही आधीच भरलेला अर्ज उघडेल. अर्जातील माहिती तपासून घ्या (नाव, पत्ता, टेलिफोन, मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी).
6. ऑनलाईन अभ्यागत (व्हिजीटर) नोंदणी अर्ज पूर्ण भरा.
7. ई-मेल आणि एसएमएसद्वारे तुमचा व्हिजीटर क्रमांक आणि आणि क्यूआर कोड मिळवा. यातून तुमची नोंदणी झाल्याची पुष्ठी होईल.
8. ट्रेड शोमध्ये तुमचा नोंदणी क्रमांक किंवा मोबाईलमधील किंवा छापील स्वरूपातील क्यूआर कोड घेऊन या.
9. तुमचा नोंदणी क्रमांक सादर करा किंवा हॉल 1 आणि हॉल 3 मधील HGH India 2022 च्या पूर्व-नोंदणी अभ्यागत डेस्कवर तुमचा बॅज प्रिंट छापून घेण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

#### नव्या अभ्यागतासाठी ऑनलाईन नोंदणीसह मोफत प्रवेशाचे टप्पे

1. www.hghindia.com च्या होम पेज अथवा व्हिजीटर मेन्यूमधील 'व्हिजीटर रजिस्ट्रेशन' वर क्लिक करा.
2. तुमचा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक किंवा ईमेल आयडी नोंदवा आणि सेंड ओटीपीवर क्लिक करा.
3. नवीन अभ्यागत म्हणून क्लिक हिअरवर क्लिक करा.
4. तुमचा मोबाईल क्रमांक किंवा ईमेल आयडी नोंदवून सेंड ओटीपीवर क्लिक करा.
5. तुमच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर किंवा ईमेल आयडीवर प्राप्त झालेला ओटीपी नोंदवा.
6. तुमचा अभ्यागत नोंदणी अर्ज पूर्ण भरा.
7. ई-मेल आणि एसएमएसद्वारे तुमचा व्हिजीटर क्रमांक आणि आणि क्यूआर कोड मिळवा. यातून तुमची नोंदणी झाल्याची पुष्ठी होईल.
8. ट्रेड शोमध्ये तुमचा नोंदणी क्रमांक किंवा मोबाईलमधील किंवा छापील स्वरूपातील क्यूआर कोड घेऊन या.
9. तुमचा नोंदणी क्रमांक सादर करा किंवा हॉल 1 आणि हॉल 3 मधील HGH India 2022 च्या पूर्व-नोंदणी अभ्यागत डेस्कवर तुमचा बॅज प्रिंट छापून घेण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

### महत्त्वाचे मद्दे

1. HGH Indiaमध्ये मोफत प्रवेशासाठी प्रवेश बॅज हा तुमचा वैयक्तिक हक्क आहे आणि तो अजिबात हस्तांतरणीय नाही.
2. गेल्या वर्षी जर तुम्ही HGH Indiaमधील नोंदणीकृत अभ्यागत असलात तर, आयोजकांकडून तुमचा संदर्भ क्रमांक जाणून घ्या आणि HGH India 2022 च्या ऑनलाईन नोंदणीच्या नूतनीकरणासाठी त्याचा वापर करा.
3. HGH India 2022 मधील मोफत प्रवेशासाठी, सर्व जुन्या अभ्यागतांनी नोंदणी नूतनीकरण करणे अनिवार्य आहे. नूतनीकरण नसल्यास, रु. 1000/- इतके स्पॉट नोंदणी शुल्क भरावे लागेल.
4. HGH India हा एक काटेकोर ट्रेड शो आहे. म्हणून, ग्राहकांना यात प्रवेश नाही. या ठिकाणी किरकोळ खरेदीची परवानगी नाही. जर तुम्ही किरकोळ खरेदी करत असल्याचे आढळून आल्यास अभ्यागत म्हणून तुम्हाला अपात्र ठरवण्यात येईल.
5. 15 वर्षांखालील मुलांना प्रवेश नाही.
6. कोणत्याही अभ्यागताला प्रवेश नाकारण्याचा अधिकार आयोजकांकडे सुरक्षित आहे.

अधिक माहितीसाठी आणि शंकाचे निरसन करण्यासाठी कृपया भेट द्या

श्री. अमर शर्मा : +91 99 676 00286 / श्री. एलाका अन्सारी: +91 99 301 72973 ईमेल: visitors@hghindia.com

**www.hghindia.com**

नोंदणीसाठी: www.hghindia.com मुंबई: फोन क्र. +91 (22) 2421 4111, दिल्ली: फोन क्र. +91 (11) 2571 4111 ईमेल: visitors@hghindia.com